इमारती लाकूड, कोळसा, बांबू, जळाऊ लाकूड [आगारांमध्ये व मूळ जागी असलेले] यांच्या विक्रीबाबतच्या एकीकृत आगार विक्री शर्ती- या शर्तीमधील फेरबदल.

महाराष्ट्र शासन,
महसूल व वन विभाग,
निर्णय क्रमांक: टीएमआर १६८०/११७२४१/सीआर-९३७/तीन/फ-९,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२, दिनांक २९ एप्रिल, १९८६.

पहा :- [एक] शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्रमांक: टीएमआर १६७७/१२८१७८/एफ-५, दिनांक २४ सप्टेंबर १९८०.

[दोन] शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्रमांक: टीएमआर १६८०/११७२४१/तीन/एफ-५, दिनांक ५ ऑक्टोबर १९८१.

[तीन] मुख्य वनसंरक्षकांचे पत्र क्रमांक: डी-९/टीएमआर/सी/८४१/७६-७७/९०५५, दिनांक ९ जानेवारी १९८१ आणि १०४९३, दिनांक २७ फेब्रुवारी १९८१.

निर्णय :- वन आगारांमधील विक्रीचे काम सुरळीतपणे चालण्याची खातरजमा करण्यासाठी आणि इमारती व जळाऊ लाकडाच्या व्यापाऱ्यांच्या आर्थिक अडचणी व गैरसोयी दूर करण्यासाठी [इमारती लाकूड, जळाऊ लाकूड, कोळसा व बांबू यांच्या विक्रीबाबतच्या] एकीकृत आगार विक्री शर्तीमधील विवक्षित शर्तींमध्ये आणखी काही फेरबदल करावे काय हा प्रश्न मागील काही कालावधीपासून शासनाच्या विचाराधीन होता. वरील शर्तींना शासनाने, दिनांक ५ ऑक्टोबर १९८१ च्या पूर्वोक्त निर्णयाद्वारे फेरबदल केलेल्या, महसूल व वन विभागाच्या दिनांक २४ सप्टेंबर १९८० च्या पूर्वोक्त निर्णयाद्वारे मंजूरी दिलेली होती. काळजीपूर्वक विचार केल्यानंतर आणि इतर काही मुद्दे देखील विचारात घेतल्यानंतर शासन, आगारांमधील आणि मूळ जागेवरील इमारती लाकूड, जळाऊ लाकूड, कोळसा व बांबू यांच्या एकीकृत आगार विक्री शर्तींमध्ये [जोडपत्र "ब" म्हणून टंकलिखित केलेल्या] याद्वारे दिनांक १ ऑक्टोबर १९८६ पासून आणखी फेरबदल करत आहे.

२. हे आदेश विधी व न्याय विभागाच्या सहमतीने [पहा-अनौपचारिक संदर्भ क्रमांक: १११४८/ई, दिनांक २८ जून १९८५] आणि वित्त विभागाच्या सहमतीने [पहा: त्यांचा अनौपचारिक संदर्भ क्रमांक: सीआर-११३/इएक्सपी-१०, दिनांक ६ फेब्रुवारी १९८६] काढण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

[सही] एम. आर. पांडे,
कार्यासन अधिकारी,
महसूल व वन विभाग.

सहपत्र : जोडपत्र "ब"

प्रत :-

प्रधान मुख्य वनसंरक्षक, महाराष्ट्र राज्य, नागपूर [५० प्रती],
मुख्य वनसंरक्षक [उत्पादन], महाराष्ट्र राज्य, नागपूर [५ प्रती],
मुख्य वनसंरक्षक [संधारण], महाराष्ट्र राज्य, नागपूर [५ प्रती],
व्यवस्थापकीय संचालक, फॉरेस्ट डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन ऑफ महाराष्ट्र लिमिटेड, नागपूर [२५ प्रती],
सर्व प्रादेशिक व्यवस्थापक, फॉरेस्ट डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन ऑफ महाराष्ट्र लिमिटेड, [प्रत्येकी ५ प्रती],
सर्व विभागीय व्यवस्थापक, फॉरेस्ट डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन ऑफ महाराष्ट्र लिमिटेड,
सर्व वनसंरक्षक, [प्रत्येकी ५ प्रती],
सर्व विभागीय वन अधिकारी आणि स्वतंत्र उपविभागांचे उप विभागीय अधिकारी,
वित्त विभाग, [व्यय-१०], मंत्रालय, मुंबई,
विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई,
महालेखापाल, महाराष्ट्र-दोन, नागपूर,
महसूल व वन विभागाची कार्यासने एफ-१ / एफ-२ / एफ-३/ एफ-६ / एफ-५/ एफ-१० यांचे कार्यासन अधिकारी,
निवड नस्ती, कार्यासन एफ-९, महसूल व वन विभाग.

जोडपत्र "ब"

शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्रमांक: टिएमआर १६८०/ [illegible]/तीन/एफ-९, दिनांक २९ एप्रिल, १९८५ याचे सहपत्र.

## एकीकृत आगार विक्री शर्ती

इमारती लाकूड, जळाऊ लाकूड, कोळसा इत्यादींची [आगारांमध्ये व मूळ जागी असलेले] जाहीर लिलावाव्दारे विक्री करण्यासंबंधीच्या अटी व शर्ती.

### लिलावाची मुदत :-

उपवनसंरक्षक / विभागीय वन अधिकारी / स्वतंत्र उपविभागाचे उपविभागीय वन अधिकारी, हे महाराष्ट्र शासनासाठी व त्यांच्या वतीने, खाली दर्शविण्यात आलेल्या अनुसूचीमध्ये केलेल्या वर्णनानुसार छप्पीत असलेले इमारती लाकूड/जळाऊ लाकूड/कोळसा इत्यादींची जाहीर लिलावाव्दारे विक्री करतील. ही विक्री .......... येथे दिनांक ..........१९.......... रोजी.......... वाजेपासून पुढील अटींवर व शर्तींवर करण्यात येईल.

### विक्रीच्या अटी व शर्ती :-

१. बोली बोलणे म्हणजे विक्रीच्या या शर्तींना पूर्णपणे व अनिर्बंध संमती देणे असे मानण्यात येईल. इच्छुक बोलीदारांनी विक्रीच्या शर्तींवर त्यांची संमतीदर्शक सही करणे आवश्यक आहे.

२. लिलावात ठेवण्यात आलेल्या वनोपजाचे परिमाण व तपशील या बाबी खाली दर्शविलेल्या अनुसूचीमध्ये नमूद केल्याप्रमाणे असून त्या खाली सही करणा-या अधिका-याच्या माहितीनुसार बरोबर आहेत परंतु त्यांची कोणत्याही प्रमाणात हमी देण्यांत येत नाही. इच्छुक बोलीदारांनी सदर छप्प्यांची जागेवरच तपासणी करून ते बरोबर असल्याबद्दल स्वत:ची खात्री करून घ्यावी.

### इसा-याची रक्कम :-

३. [अ] इच्छुक बोलीदारांनी बोली बोलण्यापूर्वी, त्यांची ज्या रक्कमेपर्यन्तची बोली बोलण्याची इच्छा असेल त्या रकमेच्या १० टक्के इतकी रक्कम इसा-याची रक्कम म्हणून खाली सही करणा-या अधिका-याकडे यापुढे उल्लेखिलेल्या रितीने जमा केल्याखेरीज त्या बोलीदाराला बोली बोलण्याची परवानगी देण्यांत येणार नाही.

परंतु, अशा रितीने जमा करावयाची इसा-याची रक्कम ही कोणत्याही बाबतीत ५०० रुपयांपेक्षा [रुपये पाचशे फक्त] कमी असणार नाही.

जमा केलेल्या इसा-याच्या रकमेवर कोणतेही व्याज मिळणार नाही.

३. [ब] इसा-याची रक्कम खालील निर्दिष्टीत कोणत्याही प्रकारे भरता येईल:

[एक] महाराष्ट्र राज्यातील कोणत्याही शासकीय कोषागाराच्या यथोचित प्राप्तपोच चलनाव्दारे, किंवा

[दोन] भारतीय स्टेट बँकेने किंवा कोणत्याही अनुसूचित बँकेने उपवनसंरक्षक/विभागीय वन अधिकारी/स्वतंत्र उप विभागाचे उप विभागीय वन अधिकारी यांचे नांवे, * ------------------------------ येथील कोषागाराच्या/उप कोषागाराच्या मुख्यालयाच्या ठिकाणी असलेल्या तिच्या शाखेवर काढलेल्या दर्शनी धनाकर्षाव्दारे किंवा दर्शनी निक्षेपाव्दारे.

[टीप:- कोषागाराचे/उप कोषागाराचे नाव संबंधित उपवनसंरक्षक/विभागीय वन अधिकारी/स्वतंत्र उप विभागाचे उप विभागीय वन अधिकारी विहित करील.]

परंतु, अपवादात्मक परिस्थितीमध्ये, विक्री करणा-या अधिका-याच्या स्वेच्छा निर्णयानुसार इसा-याची रक्कम रोख स्वरुपात जमा करता येईल व असा अधिकारी ती रक्कम स्विकारण्यास परवानगी देऊ शकेल.

[क] बोलीदार बोली बोलण्यापूर्वी उपवनसंरक्षक/विभागीय वन अधिकारी/स्वतंत्र उप विभागाचे उप विभागीय वन अधिकारी यांचेकडे किंवा त्याने या संबंधात प्राधिकृत केलेल्या कोणत्याही अधिका-याकडे प्राप्तपोच कोषागार चलान, बँक धनाकर्ष किंवा दर्शनी निक्षेप पावती सादर करील. इसा-याच्या रकमेपोटी रोख प्रदान करण्यास पूर्वोक्तप्रमाणे परवानगी दिलेली असेल तर ती प्रदाने [वरील शर्त क्र. ३[ब] च्या परंतुकामध्ये नमूद केलेल्या शर्तीच्या अधीन राहून] लिलाव विक्रीच्या ठिकाणी ठेवलेल्या विशेष काऊंटरवर करण्यात येतील.

[ड] अयशस्वी बोलीदारांनी जमा केलेली इसा-याची रक्कम लिलाव पूर्ण होण्या अगोदर सरकार जमा झालेली नसेल तर लिलाव पूर्ण झाल्यानंतर, व्यवहार्य असेल तितक्या लवकर, ती कोणतेही व्याज न देता परत करण्यात येईल.

[ई] यशस्वी बोलीदारांच्या बाबतीत, इसा-याची रक्कम लिलाव पूर्ण होण्यापूर्वी सरकारजमा झालेली नसेल तर ती रक्कम बोलीदाराकडून प्रदेय असलेल्या मोबदल्याच्या रकमेसाठी समायोजित करण्यात येईल.

[फ] कोणत्याही बाबतीत इसा-याच्या रकमेवर कोणतेही व्याज प्रदेय असणार नाही.

<u>बोलीदाराचा तपशील</u> :

४. इच्छुक बोलीदार, त्यांच्यासाठी असलेली कोणतीही पत्रे ज्या पत्त्यावर पाठवता येतील तो टपालाचा संपूर्ण लेखी पत्ता इसा-याची रक्कम भरण्याच्या वेळी देतील. पत्त्यामध्ये झालेला कोणताही बदल बोलीदार तत्परतेने उपवनसंरक्षक/विभागीय वन अधिकारी/स्वतंत्र उपविभागाचे उपविभागीय वन अधिकारी यांस लेखी कळवतील.

२०५



टपाल दाखला घेऊन त्या पत्त्यावर पाठवलेले कोणतेही पत्र इच्छुक बोलीदाराकडे यथोचितरित्या पोचले असल्याचे मानण्यात येईल.

५. लिलावाच्या वेळी बोली बोलण्याची इच्छा असलेली किंवा असलेल्या व्यक्ती कोणत्या नात्याने लिलावासाठी बोली बोलू इच्छिते/इच्छितात ते, ती किंवा त्या व्यक्ती नमूद करील/करतील, उदा., व्यवसाय संस्थेचा एकमेव मालक किंवा भागीदार म्हणून अथवा मर्यादित कंपनीचा सचिव/व्यवस्थापक/संचालक इत्यादी म्हणून व्यवसाय संस्थेच्या बाबतीत, सर्व भागीदारांची नावे प्रकट करण्यात येतील व सर्व भागीदार किंवा लिलावाशी संबंधित सर्व बाबींमध्ये सर्व भागीदारांवर बंधन घालण्याचा प्राधिकार असलेला, रीतसर नेमलेला त्यांचा न्यायप्रतिनिधी हे या शर्तीवर सही करतील. "भागीदारी विलेख" या एक अनुप्रमाणित प्रत उपवनसंरक्षकांकडे/विभागीय वन अधिका-याकडे/स्वतंत्र उपविभागाचे उपविभागीय वन अधिका-याकडे सादर करण्यात यावी. मर्यादित कंपनीच्या बाबतीत, कंपनीने या सर्व शर्तीवर सही करण्यास प्राधिकृत केलेली व्यक्ती अशी सही करील. कंपनीचे संस्थापन समयलेख व नियमावली यांची एक प्रत या शर्तींना जोडण्यात येईल. हिंदु अविभक्त कुटुंबाच्या बाबतीत, कुटुंबातील व्यक्तींची नावे प्रकट करण्यात यावीत व कत्याने/कुटुंबावर बंधान घालवू शकणा-या व्यक्तीने या शर्तीवर सही करावी व सहीखाली आपला दर्जा दर्शवावा.

६. पुढील व्यक्ती लिलावाच्या वेळी बोली बोलण्यास पात्र असणार <u>नाही/नाहीत</u>. त्या व्यक्ती म्हणजे :-

न्यायालयाने नैतिक अध:पात अंतर्भूत असलेल्या अपराधाबद्दल सिध्दापराध ठरवलेली ती/त्या व्यक्ती किंवा नादार म्हणून न्यायनिर्णीत केलेली/केलेल्या किंवा शासनाची देणी देण्याबाबत जिने कसूर केली असेल अशी व्यक्ती किंवा अज्ञान असलेली/असलेल्या व्यक्ती किंवा विकल मनाची/मनाच्या व्यक्ती.

७. जी व्यक्ती/ज्या व्यक्ती लिलावात बोली बोलली असेल/बोललेल्या असतील आणि जिची/ज्यांची बोली मान्य करण्यात आली असेल ती/त्या व्यक्ती या शर्तीनुसार बोली बोलण्यास अर्हताप्राप्त व्यक्ती नाही/नाहीत असे लिलाव चालू असतांना किंवा त्यानंतर कोणत्याही वेळी आढळून आले तर तिने/त्यांनी जमा केलेली इसा-याची रक्कम ताबडतोब सरकारजमा करण्यात येईल व तिची/त्यांच्या नावे मान्य करण्यांत आलेली/आलेल्या बोली रद्द केली/केल्या जाण्यास पात्र ठरेल/ठरतील आणि त्या प्रसंगी ती/त्या व्यक्ती अशा बोली रद्द करण्याबद्दल कोणतीही भरपाई मिळण्यास हक्कदार असणार <u>नाही/नाहीत</u>.

<u>विक्रीची कार्यपध्दती :-</u>

८. उपवनसंरक्षकास/विभागीय/वन अधिका-यास/स्वतंत्र उपविभागाचे उप विभागीय वन अधिका-यास त्यांच्या स्वेच्छानिर्णयानुसार पुढील गोष्टी करता येतील :-

अ] लिलावाच्या कोणत्याही टप्प्यामध्ये कोणालाही बोली बोलण्यास मनाई करणे.